तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २२ जानेवारी २०२५

आतील पानावर
पान २– अबब! उर्वशी स्टेज परफॉर्मन्ससाठी ...
पान ४ – राकेश मारियांच्या बायोपिकमध्ये जॉन
पान ५ – 'सूर्या ४५' मधून ए. आर. रहमानची माघार
पान ६ – नव्या वर्षात सिनेसृष्टीत दिसणार यंग ब्रिगेड
पान ७ – 'आशा'त रिंकू राजगुरु साकारणार...



# अर्जुन कपूर 'या' दोघींसोबत झळकणार



बॉलिवूड अभिनेता अर्जुन कपूरने 'सिंघम अगेन' या चित्रपटात शेवटची भूमिका साकारली होती. या चित्रपटातील त्याच्या खलनायकाच्या भूमिकेचे प्रेक्षक आणि समिक्षकांनी कौतुक केले होते. आता अर्जुनने त्याच्या नवीन चित्रपटाची घोषणा केली आहे. तो लवकरच 'मेरे हसबंड की बीवी' या कॉमेडी चित्रपटात झळकणार आहे. चित्रपटाच्या रिलीजची तारीख देखील जाहीर करण्यात आली आहे. अर्जुन कपूर सिंघम अगेन चित्रपटानंतर 'मेरे हसबंड की बीवी'मध्ये प्रमुख भूमिका साकारताना दिसेल. अर्जुनसोबतच या चित्रपटात अभिनेत्री भूमी पेडणेकर आणि रकूल प्रीत सिंग या दोघी प्रमूख भूमिकेत दिसणार आहेत. अर्जुनच्या चाहत्यांना हा चित्रपट पाहण्यासाठी आणखी काही दिवस प्रतिक्षा करावी लागणार आहे. 'मेरे हसबंड की बीवी' चित्रपट २१ फेब्रुवारी २०२५ ला रिलीज होईल. 'लव्ह ट्रँगल नही सर्कल है' अशी या चित्रपटाची टॅगलाईन आहे. यावरूनच यामध्ये प्रेक्षकांना प्रेमाचा ट्रँगल पाहायला मिळेल. पूजा एंटरटेनमेंट अंतर्गत या चित्रपटाची निर्मिती झाली असून वाशु भगनानी आणि जॅकी भगनानी हे याचे निर्माते आहेत. मुदस्सर अजीझ यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. याआधीच्या चित्रपटात अर्जुनने खलनायकाची भूमिका साकारली होती. त्याच्या या भूमिकेला प्रेक्षकांची पसंती देखील मिळाली. आता नवीन चित्रपटात अभिनेता चाहत्यांना हसवताना दिसणार आहे. त्यामुळे या चित्रपटाला रिलीजनंतर कसा प्रतिसाद

# तारा सिंग अन् सकीना पुन्हा येणार




बॉलिवूड अभिनेता सनी देओल आणि अमीषा पटेलचा 'गदर- एक प्रेमकथा' हा सिनेमा २००१ साली प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. त्याच्या २२ वर्षांनंतर 'गदर' चा सिक्वल सिनेमागृहात प्रदर्शित करण्यात आला. या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली. २२ वर्षांनंतरही सनी देओलची तीच क्रेझ पाहायला मिळाली. आता चित्रपटाच्या तिसऱ्या भागाची चर्चा सुरु झाली आहे. याबद्दल अभिनेत्री अमिषा पटेल हिनं अपडेट दिलं आहे.

'गदर- एक प्रेमकथा' आणि 'गदर २' मध्ये अमिषा पटेलने सकीनाची भूमिका साकारली आहे. तिच्या पात्राला प्रेक्षकांचं भरपूर प्रेम मिळालं. आता नुकतंच अभिनेत्री चित्तौडगड येथे पोहोचली होती. यावेळी चाहत्यांना तिनं नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. अमिषानं शहरातील मिष्टान्न प्रतिष्ठानच्या उद्घाटन समारंभाला उपस्थिती लावली होती. यावेळी जेव्हा अमिषा पटेलला 'गदर ३' मध्ये दिसणार आहे का असे विचारण्यात आले, तेव्हा ती हसत म्हणाली, अगदी!' तारा आणि सकिनाशिवाय गदर अपूर्ण आहे. तिच्या या विधानामुळे चाहत्यांची उत्कंठा वाढली आहे. हा एक पीरियड ॲक्शन ड्रामा असणार आहे. तिसऱ्या भागाच्या कथानकाबद्दल लेखक सध्या काम करत आहेत.' गदर ३'मध्येही सेम कास्ट असणार आहे.




# अबब! उर्वशी स्टेज परफॉर्मन्ससाठी घेते ७ कोटी

नववर्ष २०२५ हे अनेकांसाठी खास ठरलं आहे. या नवीन वर्षाचं सर्वांनीच मोठ्या आनंदात, जल्लोषात स्वागत केलं. बॉलीवूड अभिनेत्री उर्वशी रौतेला अनेकदा कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. दरम्यान, नुकत्याच झालेल्या एका न्यू इयर सेलिब्रेशनमध्ये स्टेज परफॉर्म करण्यासाठी अभिनेत्रीने कोटींच्या घरात मानधन घेतल्याचं सांगितलं जातंय. सोशल मीडियावरही तिची तगडी फॅनफॉलोइंग आहे. अगदी नववर्षाच्या पहिल्याच दिवशी कोलकाता येथील न्यू इयर कॉन्सर्टमध्ये स्टेज परफॉर्मन्ससाठी अभिनेत्रीने चांगलीच फी घेतली. या कॉन्सर्टमध्ये तिने 'स्त्री-२ 'मधील 'आज की रात' गाण्यावर जबरदस्त डान्स केला. तिच्या या स्टेज परफॉर्मन्सचा व्हिडीओ सोशल मीडियावरही चांगलाच व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये उर्वशी लाल रंगाच्या ड्रेसमध्ये स्टेजवर डान्स करताना दिसते आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, उर्वशीने या गाण्यासाठी ७ कोटी रुपये इतकं मानधन घेतल्याचं सांगण्यात येत आहे. तमन्ना भाटियाने 'स्त्री-२' मधील गाण्यासाठी जितकं मानधन घेतलं त्यापेक्षाही जास्त फी अभिनेत्रीने या स्टेज परफॉर्मन्ससाठी आकारली आहे. मात्र, तमन्ना भाटियाने या आयटम साँगसाठी १ कोटी रुपये इतकं मानधन घेतलं होतं. पण, आता एक परफॉर्मिंग आर्टिस्ट म्हणून सर्वात जास्त मानधन घेणारी अभिनेत्री म्हणून उर्वशी रौतेलाच्या नावाची चर्चा होऊ लागली आहे.


उर्वशी रौतेलाच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं झालं तर ती नंदमुरी बाळकृष्ण यांच्या 'एनबीके १०९' मध्ये बॉबी देओलसोबत काम करणार आहे. त्याचबरोबर आफताब आणि जस्सी गिल यांच्या 'कसूर' चित्रपटामध्येही दिसण्याची शक्यता आहे.

# मग शोले सारखा सिनेमा कसा बनणार



अनिल कपूर आणि अनुराग कश्यप यांनी २०२० मध्ये विक्रमादित्य मोटवाने सोबत 'एके वर्सेस एके' या चित्रपटात काम केले होते. हा चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित झाला होता. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर चार वर्षांनी अनिल कपूरने सांगितले की, या चित्रपटात स्वत:ला पाहून खूप आश्चर्य वाटले. एका मुलाखतीत अनिल कपूर म्हणाले की, जेव्हा लोकांनी मला aKrvaK मध्ये पाहिले तेव्हा ते आश्चर्यचकित झाले. ज्येष्ठ अभिनेत्याने खुलासा केला की संदीप रेड्डी वंगा, ज्याने त्याला निमलसाठी साइन केले, त्याने akrv aK वर स्वाक्षरी केल्यावर आश्चर्यचकित झाले. हा चित्रपट दिग्गज अभिनेत्याचे स्टारडम नष्ट करेल, असे चित्रपट निर्मात्यांना वाटत होते. या संवादात अनिल कपूरने चित्रपट आणि त्यासाठी मिळालेल्या फीबद्दलही बोलले आहे. अनिल कपूर म्हणाले की, सर्वच प्रकल्प पैशासाठी केले जात नाहीत, काही त्यांच्या आवडीसाठीही काम करतात. आजच्या मुख्य अभिनेत्यांबद्दल बोलताना अनिल कपूर म्हणाले की, एक अभिनेता दुसऱ्या अभिनेत्यासोबत काम करण्यास टाळाटाळ करतो. सर्वांनी असा विचार केला असता तर शोलेसारखा चित्रपट बनला नसता, असेही ते म्हणाले.

यासोबतच अनिल कपूरने स्लमडॉग मिलेनियरबद्दलही सांगितले. अभिनेत्याने सांगितले की, त्याने स्लमडॉग मिलेनियरमध्ये काम केले आहे. यामुळे त्याला काहीतरी वेगळे करण्याची संधी मिळाली. डॅनी बॉयलसोबत काम करण्याची संधी मिळाल्याचे अनिल कपूरने सांगितले. अनिल कपूर स्वतःला भाग्यवान समजतो की या चित्रपटाचा एक भाग आहे.




# वीर पहारिया दिसणार मुख्य भूमिकेत

वरूण धवनचा २०२२ मध्ये आलेला 'भेडिया' हा एक हॉरर कॉमेडी चित्रपट होता. हा चित्रपट 'स्त्री,' 'स्त्री २' या चित्रपटांप्रमाणे 'मॅडोक सुपरनॅचरल युनिव्हर्स'चा एक भाग असून यात जबरदस्त ॲक्शन सुद्धा होती. या चित्रपटात बॉलीवूडमध्ये 'स्काय फोर्स' चित्रपटातून पदार्पण करणार असलेल्या 'या' अभिनेत्याने वरुण धवनच्या बॉडी डबलचे काम केले होते. या नवोदित अभिनेत्याचे नाव आहे वीर पहारिया. वीर पहारिया हा जान्हवी कपूरच्या प्रियकराचा भाऊ आहेत. वीरने थिएटर, संगीत आणि नृत्य याचा अभ्यास केला आणि त्याने अमर कौशिक यांच्या 'भेडिया' चित्रपटातून असिस्टंट डायरेक्टर म्हणून आपला प्रवास सुरू केला, एवढंच नाही तर त्याने 'भेडिया' सिनेमात काही दृश्यांमध्ये वरुण धवनच्या बॉडी डबलची भूमिकाही साकारली होती. लवकरच तो अक्षय कुमारच्या ऍरियल ॲक्शन फिल्म 'स्काय फोर्स' या चित्रपटाद्वारे हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण करण्यासाठी सज्ज आहे. २०२२ मध्ये वीरने आपल्या अनुभवाबद्दल आनंद व्यक्त करताना सोशल मीडियावर काही बिहाइंड-द-सीन्स फोटो शेअर केले होते. या फोटोंमध्ये वरुण धवनच्या काही दृश्यांचे शूट करतानाचे फोटो आणि व्हिडीओ होते. या फोटोंमध्ये वरुण धवन, त्याची पत्नी नताशा दलाल, अभिषेक बॅनर्जी आणि दिग्दर्शक अमर कौशिक यांच्यासह टीमचे इतर सदस्य दिसत आहेत. त्या पोस्टला वीरने, माझ्या पाचव्या चित्रपटातील भेडियामधील असिस्टंट डायरेक्टर आणि बॉडी डबलचा अविस्मरणीय अनुभव. असे कॅप्शन दिले होते.

# अक्षय कुमारची होणार 'स्त्री ३'मध्ये एन्ट्री?

बॉलीवूड अभिनेता सलमान खान 'टायगर ३' चित्रपटानंतर आता 'द बुल' या नव बॉलीवूडचा खिलाडी अर्थात अक्षय कुमारचे मागील काही चित्रपट अपयशी ठरले. दिवाळीत रिलीज झालेला त्याचा 'सिंघम अगेन' चित्रपट मात्र यशस्वी ठरला. यानंतर अक्षयने 'स्त्री २' या चित्रपटात कॅमिओ देखील केला होता, जो प्रेक्षकांना खूप आवडला. ८०० कोटींहून अधिक कमाई करून हा चित्रपट आतापर्यंत बॉलिवूडचा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला आहे.


या चित्रपटात अक्षयने सरकटाच्या वंशजाची भूमिका साकारली होती. यानंतर आता अक्षय 'स्त्री ३'मध्ये दिसणार का असा सवाल केला जात आहे. यातच आता मॅडॉक फिल्म्सने नवीन चित्रपटांची घोषणा करत 'स्त्री ३' ऑगस्ट २०२८ मध्ये प्रदर्शित होईल अशी माहिती दिली. 'स्काय फोर्स'च्या ट्रेलर लाँचवेळी अक्षय कुमारने दिनेश विजानसोबतचा त्याचा 'दीड' चित्रपट असे वर्णन केले. जेव्हा त्याला विचारण्यात आले की तो या हॉरर-कॉमेडी विश्वाचा एक भाग बनणार का? तर तो म्हणाला, 'काय बोलू?' हे निर्माते दिनेश विजान आणि ज्योती देशपांडे ठरवतील. ते पैसे गुंतवणार असून अमर कौशिक यांना दिग्दर्शन करायचे आहे. अक्षयचे बोलणे संपल्यावर दिनेशने त्याला दुजोरा दिला आणि म्हणाला, 'नक्कीच, तो या विश्वाचा एक भाग आहे! तो आमचा थानोस आहे'. त्यामुळे आता अक्षय पुढील चित्रपटात पाहायला मिळणार का हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. 'स्त्री २' गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये रिलीज झाला होता. अमर कौशिक दिग्दर्शित, या चित्रपटात राजकुमार राव आणि श्रद्धा कपूर व्यतिरिक्त पंकज त्रिपाठी, अभिषेक बॅनर्जी आणि अपारशक्ती खुराना यांच्याही मुख्य भूमिका होत्या.



# राकेश मारियांच्या बायोपिकमध्ये जॉन



हिंदी मुंबईत झालेल्या २६/११ हल्ल्यांमध्ये सामील मोस्ट वॉंटेड दहशतवादी अब्दुल रहमान मक्कीचा अलिकडेच पाकिस्तानात मृत्यू झाला. तर या हल्ल्यावेळी दहशतवाद्यांना भिडणारे सुपरकॉप राकेश मारिया यांचा आता बायोपिक येत आहे. या बायोपिकमधीय जॉन अब्राहम मुख्य भूमिकेत असणार आहे. जॉन हा बॉलिवूडमधील ॲक्शन हीरो म्हणून ओळखला जातो, फोर्स, परमाणु, बाटला हाउस, सत्यमेव जयते यासारख्या चित्रपटांमध्ये त्याने हाय-ऑक्टेन ॲक्शन केली आहे. तर पठान चित्रपटात खलनायकाच्या भूमिकेद्वारेही त्याने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. आता तो भारतीय पोलीस अधिकारी राकेश मारिया यांची व्यक्तिरेखा साकारणार आहे. राकेश मारिया यांच्या बायोपिकमध्ये १९९३ मधील मुंबई बॉम्बस्फोट, जावेरी बाजार स्फोट आणि २६/११ हल्ल्याच्या तपासाला दाखविले जाणा आहे. राकेश मारिया हे मुंबईच्या इतिहासातील सर्वात प्रसिद्ध पोलीस अधिकार्यांपैकी एक राहिले आहेत. राकेश मारिया हे १९८१ ते २०१७ पर्यंत स्वत:च्या कार्यकाळात अनेक दहशतवाद्यांना पकडण्यास यशस्वी ठरले आहेत. हा बायोपिक चालू वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीत चित्रित होणार आहे. परंतु याच्या दिग्दर्शकाचे नाव अद्याप निश्चित झालेले नाही. चित्रपटात राकेश मारिया यांचा पोलीस उपायुक्तापासून महासंचालक होण्यापर्यंतचा प्रवास दाखविला जाणार आहे. जॉन अब्राहम याचबरोबर तेहरान आणि डिप्लोमॅट या चित्रपटांमध्ये मुख्य भूमिकेत आहे.




# पाताल लोक २ ची प्रेक्षकांना भूरळ

ओटीटी प्लॅटफॉर्म ॲमेझॉन प्राइम व्हीडिओवर २०२० मध्ये लॉंच झालेल्या 'पाताल लोक' या सीरिजला प्रेक्षकांचा जबरदस्त प्रतिसाद मिळाला होता. तेव्हापासूनच या सीरिजचा दुसरा सीझन कधी सुरू होणार याबाबत सातत्याने प्रेक्षकांकडून विचारणा केली जात होती.

आता ४ वर्षांनी प्रेक्षकांची प्रतिक्षा संपली आहे. काही दिवसांपूर्वीच सीरिजच्या सीझन २ चा प्रोमो समोर आला होता. आता पाताल लोक २ चित्रपटगृहात दाखल झाला आहे. पहिल्या सीझनप्रमाणेच हा दुसरा सीझन देखील प्राइम व्हीडिओ या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रेक्षकांना पाहायला मिळत आहे. पहिल्या सीझनमध्ये जयदीप अहलावत, इश्वाक सिंग आणि अभिषेक बॅनर्जी यांच्या प्रमुख भूमिका होत्या. सीरिजच्या पहिल्या सीझनमध्ये जयदीप अहलावत यांनी इन्स्पेक्टर हातीराम चौधरी आणि इश्वाक सिंग यांनी कॉन्स्टेबल अन्सारी यांची भूमिका साकारली होती. दुसऱ्या सीझनमध्ये या कलाकारांसोबतच तिलोत्तमा शोम, नागेश कुकुनूर आणि जाह्नू बरुआ सारखे नवीन चेहरे देखील दिसत आहेत. पहिल्या सीझनला प्रेक्षकांसह समीक्षकांची देखील दाद मिळाली होती. याशिवाय, सीरिजला अनेक पुरस्कारही मिळाले होते. पहिल्या सीझन एकूण ९ भागांमध्ये रिलीज झाला होता. त्यामुळे दुसऱ्या सीझनमध्ये देखील ९ भाग आहेत. दुसऱ्या सीझनचे दिग्दर्शन अविनाश अरुण धावरे यांनी केले आहे. पाताल लोक एक प्रमाणेच पाताल लोक २ ची प्रेक्षकांना भूरळ पडत असून प्रेक्षक याला चांगला प्रतिसाद देत आहेत. पाताल लोक २ मधील तलोत्तमा शोम, नागेश कुकुनूर आणि जाह्नू बरुआ सारखे नवीन चेहऱ्यांनीही आपल्या अभिनयाची चांगलीच छाप पाडल्याने प्रेक्षकांना ही सिरीज आवडत असल्याचे दिसत आहे.

# करण जोहर-कार्तिक आर्यनमधील वाद मिटला!




दिग्दर्शिक, निर्माता करण जोहर आणि अभिनेता कार्तिक आर्यन यांच्या नवीन सिनेमाची घोषणा नुकतीच झाली आहे. यासोबत करण आणि कार्तिकमधला वादही मिटला असल्याचं दिसत आहे. 'दोस्ताना २' सिनेमातून कार्तिकचा पत्ता कट केल्यानंतर त्यांच्यात वाद असल्याचं समोर आलं होतं. करण जोहर कार्तिक आर्यनला सिनेमात कास्ट करत नसल्याची चर्चा होती. करण जोहर निर्मित कार्तिक आर्यनचा आगामी सिनेमा 'तू मेरी मै तेरा, मै तेरा तू मेरी' सिनेमाची घोषणा केली. याची झलक दाखवणारा एक व्हिडिओ त्याने शेअर केला आहे. यासोबत त्याने लिहिले, तुम्हारा रे आ रहा है रुमी, मम्मी की खाई हुई कसम, ये मम्मा बॉय पूरी करके रहता है.

कार्तिकचा हा सिनेमा रोमॅंटिक कॉमेडी आहे. यामध्ये अभिनेत्री नक्की कोण असणार हे रिव्हील करण्यात आलेले नाही. 'सत्यप्रेम की कथा'चे दिग्दर्शक समीर विध्वंस या सिनेमाचं दिग्दर्शन करणार आहेत. त्यामुळे चाहते फारच आतुर आहेत. तसंच सिनेमाचं टायटलही खूपच मोठं असल्याने याचीही चर्चा आहे. २०२६ मध्ये सिनेमा रिलीज होणार आहे.



# प्रभास सोबत प्रशांत नील लवकरच काढणार चित्रपट

समांथा प्रभास अलीकडेच अनेक चित्रपटांमध्ये वेगवेगळ्या अवतारात दिसला. त्याची फिल्मोग्राफी ही स्क्रिप्ट निवडीबद्दलच्या त्याच्या स्पष्टतेचा पुरावा आहे, त्याचे सालार दिग्दर्शक प्रशांत नील यांनी हे उघड केले आहे की सालार चित्रपटाच्या स्क्रिप्टिंग दरम्यान प्रभासचे इनपुट उपयुक्त ठरले. ब्लॉकबस्टर 'सालार'च्या वर्धापनदिनानिमित्त संभाषणात प्रशांतने सामायिक केले की, प्रभासनेच सालारमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडवून आणला. सालारचे दिग्दर्शक प्रशांत नील यांनी प्रभासबद्दल काही गोष्टी शेअर केल्या आहेत. त्यांनी सांगितले की मी नेमके तपशील सांगू शकत नाही कारण ते दुसऱ्या भागात बघायला मिळेल. प्रभासला ड्रामा कळतो. त्याला माहित आहे की मी KGF सारखा चित्रपट बनवला आहे, म्हणून तो मुख्य मुद्द्यांवर काहीही बोलत नाही परंतु तो नेहमी नाट्यमय भागाकडे पाहतो. दिग्दर्शक म्हणाले, 'मी यावर पूर्णपणे खूश नाही. पहिल्या भागात केलेल्या प्रयत्नांमुळे मी थोडा निराश झालो आहे. KG$ 2 मधून बाहेर पडल्यावर जाणीवपूर्वक मी समाधानी झालो की नाही हे मला माहीत नाही, पण ते घडल्यापासून मी सालार २ हा माझ्या सर्वोत्कृष्ट चित्रपटांपैकी एक बनवण्याचा निर्णय घेतला. सालार २ साठी मी केलेले लेखन हे माझ्या सर्वोत्तम कामांपैकी एक आहे.





# 'सूर्या ४५' मधून ए. आर. रहमानची माघार

आरजे बालाजी दिग्दर्शित बहुप्रतिक्षित चित्रपट 'सूर्या ४५' सध्या कोईम्बतूर आणि आसपासच्या भागात शूट केला जात आहे. तथापि, अलीकडील अद्यतनांमध्ये असे दिसून आले आहे की 'सूर्या ४५' च्या पोस्टरमधून संगीतकाराचे नाव गायब असल्याने एआर रहमानने या प्रकल्पातून माघार घेतली आहे. वास्तविक, सुरियाच्या आगामी चित्रपटाचे संगीतकार म्हणून एआर रहमानची नियुक्ती करण्यात आली आहे, ज्याचे तात्पुरते नाव सूर्या ४५ आहे. हा चित्रपट सुरुवातीला ए.आर. रहमान सोबत संगीतकार म्हणून लॉन्च केला होता. तथापि, नुकतेच, निर्मात्यांनी एक पोस्टर जारी केले, ज्यामध्ये नवीन संगीतकार म्हणून सई अभ्यंकरची चित्रपटाच्या टीममध्ये समावेश करण्यात आला आहे. सई अभ्यंकरच्या स्वागतासाठी निर्मात्यांनी अधिकृतपणे पोस्टर शेअर केले आहे. सुर्याच्या चित्रपटाच्या पोस्टरवरून असेही समोर आले आहे की टलीसोबतच्या कामासाठी ओळखले जाणारे जीके विष्णू देखील या चित्रपटात काम करणार आहेत. टिपू आणि हरिणी या गायकांचा मुलगा साई अभ्यंकर हा तरुण गायक आणि संगीतकार आहे. अलीकडेच त्याच्या गाण्याला Sotify Wraed नुसार २०२४ मधील सर्वात जास्त ऐकले गेलेले तमिळ गाणे म्हणूनही नावाजण्यात आले. वास्तविक, सूर्याच्या चित्रपटात एआर रहमानची जागा अशा वेळी घेण्यात आली आहे जेव्हा तो करिअरमध्ये ब्रेक घेत असल्याच्या अफवा चर्चेत आहेत. रहमानची मुलगी खतिजा रेहमानने अलीकडेच या अफवांचे खंडन केले असले तरी, त्याच्या जागी सई अभ्यंकर येणार असल्याने पुन्हा एकदा नेटिझन्स चिंतेत पडले आहेत. दरम्यान, एआर रहमानने पत्नी सायरा बानूपासून विभक्त झाल्याची घोषणा केल्यानंतरही तो चर्चेत आहे.

# 'टॉक्सिक' चित्रपटाचे पोस्टर रिलीज

साऊथचा सुपरस्टार यश त्याच्या "KGF 2' चित्रपटामुळे लोकप्रिय झाला. यानंतर आता चाहते त्याच्या आगामी चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहे. यातच यशने सोशल मीडियावर 'टॉक्सिक' चित्रपटाचे पोस्टर शेअर केले  पोस्टरमध्ये यश सूट आणि टोपी घालून, एका कारच्या जवळ सिगारेट ओढताना दिसत आहे. पोस्टरवर लिहिलं आहे, 'त्याची अनुपस्थिती तुझ्या अस्तित्वाचं संकट आहे.' या पोस्टरनंतर चित्रपटाची उत्सुकता अधिकच वाढली आहे. दरम्यान, हा चित्रपट कोणत्या दिवशी प्रदर्शित होणार याची माहिती यशने दिलेली नाही, मात्र चित्रपटाशी संबंधित एक मोठे अपडेट समोर आले आहे. यशने त्याच्या 'टॉक्सिक' चित्रपटाचे नवीन पोस्टर रिलीज केले आहे. ज्यामध्ये त्याने एक तारीख लिहिली आहे. ज्या दिवशी तो चित्रपटाशी संबंधित टीझर रिलीज करू शकतो, असे मानले जात आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन गीतू मोहनदास यांनी केले आहे. या चित्रपटात साऊथ अभिनेत्री नयनतारा आणि बॉलिवूड अभिनेत्री कियारा अडवाणी यांचा समावेश असल्याचे मानले जात आहे. मात्र निर्मात्यांनी चित्रपटाशी संबंधित कोणत्याही अपडेटवर अधिकृतरित्या माहिती दिलेली नाही.

यशचा 'टॉक्सिक' हा एक मल्टीस्टारर चित्रपट मानला जात आहे, ज्यामध्ये बॉलिवूड तसेच दक्षिणेतील अनेक कलाकार काम करताना दिसणार आहे. पण त्याच्या चित्रपटात कोणाचा समावेश असणार आणि चित्रपट कोणत्या दिवशी प्रदर्शित होणार हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.



# नव्या वर्षात सिनेसृष्टीत दिसणार यंग ब्रिगेड





शाहरुख खान, सलमान खान यांसारख्या दिग्गजांचे सिनेमे आजही बॉक्स ऑफिसवर अनेक विक्रम करून बक्कळ कमाई करतात. हे दिग्गज गेल्या ३० वर्षांपेक्षा जास्त काळापासून बॉलीवूडमध्ये असून त्यांच्या अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकत आहेत. हे सर्व स्टार्स आज त्यांच्या पन्नाशीत असून त्यांचे स्टारडम आजही टिकून आहे. या पिढीतील स्टार्सचा बॉलीवूडमध्ये प्रभाव असला तरी बॉलीवूडमध्ये आता नवी पिढी येत आहे. यात शाहरुख आणि सलमानच्या पिढीतील स्टार्सची मुले असणार आहेत.

२०२५ मध्ये, बॉलीवूडमध्ये नव्या पिढीचा प्रभाव दिसू लागणार आहे. आर्यन खान, इब्राहिम खान, राशा थडानी, शनाया कपूर आणि अमन देवगण यासारखी तरुण पिढी मनोरंजन क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी सज्ज झाली आहे. त्याचबरोबर नितांशी गोयल, अभय वर्मा आणि लक्ष लालवानी हे तरुण कलाकार सिनेमाला नवी दिशा देण्यासाठी पुढे येत आहेत.

२०२५ हे वर्ष बॉलीवूडसाठी नव्या सुरुवातीचे संकेत देते आहे. सलमान खान, शाहरुख खान, अजय देवगण आणि अक्षय कुमार यांनी वर्षानुवर्षे सिनेमाचे नेतृत्व केले. रणवीर सिंग, रणबीर कपूर, कार्तिक आर्यन, राजकुमार राव, सिद्धार्थ मल्होत्रा यांसारख्या कलाकारांनी बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी केली. मात्र, आता बॉलीवूडची नवी पिढी नव्या जोमाने आपले स्थान निर्माण करण्यासाठी तयार झाली आहे.

शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान त्याच्या 'स्टारडम' या वेब सीरिजमधून दिग्दर्शन क्षेत्रात पदार्पण करतोय. सैफ अली खानचा मुलगा इब्राहिम अली खान करण जोहरच्या बॅनरखाली अभिनय क्षेत्रात पाऊल टाकणार आहे. रवीना टंडनची मुलगी राशा थडानी १९ वर्षांची असून अजय देवगणचा पुतण्या अमन देवगणबरोबर 'आजाद' चित्रपटातून पदार्पण करणार आहे. शनाया कपूर, अहान पांडे यांसारख्या स्टार किड्सचीही बॉलीवूडमध्ये येण्यासाठी जोरदार तयारी सुरू आहे. नव्या पिढीने पारंपरिक सिनेमाच्या चौकटीच्या बाहेर पडून विविध प्रकारचे प्रयोग करण्याची तयारी दाखवली आहे. आर्यन खानने अभिनय सोडून दिग्दर्शनाची वाट धरली आहे. आमिर खानचा मुलगा जुनैद खानने यावर्षी (२०२४) मध्ये आलेल्या 'महाराज' या सामाजिक आशयाच्या पीरियड सिनेमाची त्याच्या सिनेसृष्टीतील पदार्पणाची निवड केली होती.



# ज्युनिअर एनटीआर 'वॉर २' मध्ये नवा चेहरा



बोनी कपूर यांनी नुकतंच साऊथ इंडियन सुपरस्टार ज्युनिअर एनटीआरला नवा चेहरा असे संबोधले. यामुळे साऊथ दिग्दर्शक आणि अभिनेत्याने बोनी कपूर यांना चांगलंच सुनावलं आहे. ज्युनिअर एनटीआर कोणी नवा चेहरा नसून तो सर्वात मोठ्या सुपरस्टार्सपैकी एक आहे. गलाटा इंडियाच्या राऊंडटेबलवर या सर्व फिल्ममेकर-कलाकारांनी हजेरी लावली होती. तेव्हा बोनी कपूर यांच्या वक्तव्यावर अशाप्रकारे दाक्षिणात्य स्टार्सकडून पलटवार केला गेला. निर्माते बोनी कपूर, दाक्षिणात्य निर्माते नागा वामसी आणि दाक्षिणात्य अभिनेता सिद्धार्थ या राऊंडटेबलचा भाग होते. बोनी कपूर आणि नागा वामसी सिद्धार्थसोबत साऊथ आणि बॉलिवूड सिनेमाबद्दल बोलत होते. ते म्हणाले, त्याकाळी हिंदी भाषिक प्रेक्षकांनी कमल हसन यांचं स्वागत केलं. त्यामुळे दाक्षिणात्य निर्मात्याचा आणि दिग्दर्शकाचा सिनेमाही सुपरहिट झाला. यावर सिद्धार्थने बोनी कपूर यांना विचारलं, 'बॉलिवूडमध्ये आजही असं कोलॅबोरेशन होऊ शकतं का?' यावर बोनी लगेच म्हणाले, 'आदित्य चोप्रा करु शकतो. त्याने त्याच्या सिनेमात तारक(ज्युनिअर एनटीआर)ला का घेतलं आहे?' यावर नागा वामसी आणि सिद्धार्थ दोघांनी ज्यु. एनटीआरच्या स्टारडमबद्दल सांगितले. ज्युनिअर एनटीआर सिनेमात कोणी नवा चेहरा नाही आहे. तुम्ही इंडस्ट्रीतील सर्वात मोठ्या सुपरस्टार्सपैकी एकाबद्दल बोलत आहात. ज्युनिअर एनटीआर आदित्य चोप्राच्या 'वॉर २' मध्ये दिसणार आहे. या सिनेमातून ज्युनिअर एनटीआर बॉलिवूडमध्ये पदार्पण करत आहे. सध्या सिनेमाचं शूट सुरु आहे.



# 'द इंडिया स्टोरी'मध्ये श्रेयस तळपदे झळकणार

बॉलीवूड अभिनेता श्रेयस तळपदे लवकरच 'द इंडिया स्टोरी' चित्रपटामध्ये झळकणार आहे. नुकतेच या चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात झाली आहे. श्रेयसने शूटिंगच्या मुहूर्ताचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. श्रेयससोबत या चित्रपटात अभिनेत्री काजल अग्रवालची देखील प्रमुख भूमिका असेल. श्रेयसने या चित्रपटाच्या मुहूर्ताचे फोटो सोशल मीडियावर शेअर करत लिहिले की, 'ही एक उत्तम कथा आहे, जी यापूर्वी कधीच सांगितली गेली नव्हती. लवकरच भेटूया चित्रपटगृहात.' यासोबतच, श्रेयसने चित्रपटाची रिलीज तारीख देखील जाहीर केली. श्रेयस आणि काजल अग्रवालची भूमिका असलेला 'द इंडिया स्टोरी' हा चित्रपट १५ ऑगस्ट २०२५ ला रिलीज होणार आहे. इंडिया स्टोरी चित्रपटाची कथा देशात झालेल्या मोठ्या व वादग्रस्त स्कॅंडलवर आधारित असल्याचे सांगितले जात आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन चेतन डीके हे करणार आहेत. तर या चित्रपटाची निर्मिती एमआयजी प्रॉडक्शन आणि स्टुडिओचे सागर बी शिंदे करणार आहेत. चित्रपटाची कथा देखील त्यांनीच लिहिली आहे. दरम्यान, श्रेयसच्या कामाबद्दल सांगायचे तर तो नुकताच कंगना राणौतचा 'इमर्जन्सी' हा चित्रपटात पाहायला मिळाला. यात श्रेयसने माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची भूमिका साकारली आहे, हा चित्रपट १७ जानेवारीला रिलीज झाला आहे.

# प्रसाद ओक पुन्हा एकदा दिग्दर्शकाच्या भूमिकेत



अभिनेता, लेखक, दिग्दर्शक आणि निर्माता प्रसाद ओकच्या 'धर्मवीर २' चित्रपटाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. यात आनंद दिघे यांची भूमिका त्याने उत्तमरित्या साकारली होती. यातील त्याच्या अभिनयाचे देखील अनेकांकडून कौतुक करण्यात आले होते. यातच आता नव्या वर्षात एका नवीन चित्रपटाचे प्रसाद दिग्दर्शन करताना पाहायला मिळणार आहे. 'सुशीला सुजीत' या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसाद ओक करणार आहे. दिग्दर्शक आणि कथा लेखन अशी दुहेरी भूमिका सुशीला - सुजीतमध्ये प्रसाद साकारताना दिसणार आहे. हा चित्रपट १८ एप्रिल २०२५ ला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यात स्वप्निल जोशी आणि सोनाली कुलकर्णी यांच्या मुख्य भूमिका आहे. यात सुजितच्या भूमिकेत स्वप्निल जोशी आणि सुशीलाची भूमिका सोनाली कुलकर्णी करणार असल्याचं पोस्टरवरुन स्पष्ट झाले आहे. या पोस्टरमध्ये स्वप्निल आणि सोनाली दरवाजाच्या की होलमधून डोकावून पाहाताना आश्चर्यचकित झालेले दिसतात. या चित्रपटाची निर्मिती स्वप्निल जोशी, प्रसाद ओक, मंजिरी ओक, संजय मेमाणे आणि निलेश राठी करत आहेत. याशिवाय प्रसाद 'जिलबी' या सस्पेन्स थ्रिलर चित्रपटात देखील दिसत आहे. यात तो एका उद्योगपतीची भूमिका साकारतआहे. १७ जानेवारी २०२५ ला 'जिलबी' सिनेमा प्रदर्शित झाला आहे.

# 'आशा'त रिंकू राजगुरु साकारणार खास भूमिका

अभिनेत्री रिंकू राजगुरुला 'सैराट' या चित्रपटामुळे मोठी लोकप्रियता मिळाली. यानंतर तिने अनेक मराठीसह हिंदी चित्रपटांमध्ये देखील काम केले आहे. लहान वयातच तिने आपल्या उत्तम अभिनयाच्या जोरावर मोठे यश संपादन केले आहे. आता लवकरच तिचा एक नवा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. मात्र, हा सिनेमा प्रदर्शित होण्याआधीच त्याची एका चित्रपट महोत्सवात निवड झाली आहे. यानिमित्त रिंकुने सोशल मीडियावर एक खास पोस्ट शेअर केली आहे.

रिंकूच्या या सिनेमाचे नाव 'आशा' असे असून यात ती एका आशा सेविकेची भूमिका साकारणार आहे. रिंकूने या सिनेमाचा पोस्टर शेअर करत लिहिले की, नवीन वर्षाची सुरुवात करण्यासाठी यापेक्षा सुंदर गोष्ट असू शकत नाही. तुमच्याबरोबर ही उत्कृष्ट बातमी शेअर करताना खूप आनंद होत आहे! आमचा 'आशा' चित्रपट प्रतिष्ठित '२१ व्या थर्ड आय एशियन' चित्रपट महोत्सवाच्या 'स्पर्धा' विभागासाठी अधिकृतपणे निवडला गेल्याची घोषणा करताना अभिमान वाटतो, असे म्हणत तिने आपला आनंद व्यक्त केला. रिंकूच्या या पोस्टवर सेलिब्रिटीज आणि तिच्या चाहत्यांनी कमेंट करत अभिनंदन केले आहे. 'आशा' या चित्रपटाचे दिग्दर्शन दीपक बाळू पाटील यांनी केले असून दैवता पाटील आणि निलेश कुवर यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. यात रिंकू राजगुरूसह शुभांगी भुजबळ, उषा नाईक, सुहास शिरसाठ, दिशा दानाडे मुख्य भूमिकेत आहेत. रिंकू राजगुरुच्या कामाबद्दल बोलायचे झाले तर, 'सैराट'सह तिने 'कागर', 'मेकअप', 'झिम्मा २' या मराठीत सिनेमांत काम केले आहे. तर '२०० हल्ला हो', 'अनकहीं कहाँनिया, 'झुंड' या हिंदी सिनेमांत काम केले आहे. आता तिच्या 'आशा' या आगामी चित्रपटाची देखील प्रेक्षकांमध्ये उत्सुकता आहे.



# श्रीलीला करणार बॉलीवूडमध्ये एन्ट्री



पुष्पा २ सिनेमाची जादू बॉक्स ऑफिसवर अजूनही कायम आहे. या सिनेमाने आतापर्यंतच्या अनेक सिनेमांचे रेकार्ड मोडले आहेत. पुष्पा २ सिनेमातील कलाकारांना देखील सिनेमाने लोकप्रियता मिळवून दिली आहे. या सिनेमात असलेले 'किसिग' नावाच्या गाण्यावर अभिनेत्री श्रीलीलाने केलेला डान्स काळजाचा ठोका चुकवणार होता. आता श्रीलीलाला बॉलीवूडमधील हिंदी सिनेमात अभिनय करण्याची ऑफर आली आहे. लवकरच या सिनेमाची अधिकृतरित्या घोषणा करण्यात येणार आहे. धर्मा या निर्मिती संस्थेकडून तू मेरी मैं तेरा, मै तेरा तू मेरी या नावाचा सिनेमा तयार करण्यात येणार आहे. ख्रिसमसच्या दिवशी या सिनेमाच्या नावाची घोषणा या सिनेमात मुख्य भूमिकेत असलेल्या कार्तिक आर्यनने त्याच्या सोशल मीडिया अकाऊंटवरून केली होती. या नव्या प्रोजेक्टचा भाग अभिनेत्री श्रीलीला असणार आहे. तिने या सिनेमात काम करण्याची तयारी दर्शवली असून लवकरच या सिनेमावर काम करण्यात येणार आहे. तर हा सिनेमा २०२६ मध्ये रिलीज करण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे. या सिनेमाचे दिग्दर्शन राष्ट्रीय पारितोषिक विजेते दिग्दर्शक समीर विद्वांस हे करणार आहेत. याअगोदर विद्वांस यांनी कार्तिक आर्यनसोबत सत्यपूरम प्रेम कथा नावाचा सिनेमा केला होता.

अभिनेत्री श्रीलीलाने आपल्या करिअरची सुरुवात 'चित्रांगदा' या चित्रपटातून बालकलाकार म्हणून केली. त्यानंतर अभिनय आणि डान्स कौशल्य असल्याने तिला प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली. आता ती बॉलीवूड इंडस्ट्रीमध्ये येण्यासाठी सज्ज झाली आहे.



# पालकांना घाबरत होती यामी

यामी गौतमने 'चांद के पार चलो' आणि 'ये प्यार ना होगा कम' या टीव्ही मालिकांमधून अभिनयाला सुरुवात केली. 'विकी डोनर' या चित्रपटातून त्याने बॉलीवूडमध्ये करिअरला सुरुवात केली. या अभिनेत्रीने आज स्वत:च्या जोरावर इंडस्ट्रीत स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. आयुष्मानसोबतच्या 'विकी डोनर'मधून तिने बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. या चित्रपटाबद्दल अभिनेत्रीने तिच्या पालकांची प्रतिक्रिया उघड केली होती. यामीची एक जुनी मुलाखत वेगाने व्हायरल होत आहे, ज्यामध्ये अभिनेत्री इंडिया टुडे कॉन्क्लेव्ह साऊथमध्ये तिच्या चित्रपटाबद्दल बोलताना दिसली होती. अभिनेत्री म्हणाली, तो तो काळ होता जेव्हा मी पूर्ण उत्साहाने ऑडिशन्स देत होते. त्यावेळी मला एका चांगल्या प्रक्षेपणाची संधीही मिळाली. मी पूर्णपणे स्वबळावर होते. मी जे काही काम करत होते, ती माझी चाल होती. तिथे मला साथ देणारे कोणीच नव्हते. यामीने यावर जोर दिला की, तिची कारकीर्द घडवत असताना तिला कधीही निराशेचा सामना करावा लागला नाही. अभिनेत्री म्हणाली, सुदैवाने, माझ्यासोबत असे काहीही घडले नाही. ज्यामुळे मला कोणत्याही इंडस्ट्रीमध्ये काम करण्यापासून परावृत्त केले गेले आहे, माझ्यासाठी, चित्रपट कोणत्या भाषेत आहे हे महत्त्वाचे नाही. या चित्रपटाबद्दल तिच्या पालकांच्या प्रतिक्रियेबद्दल बोलताना अभिनेत्री म्हणाली, 'जेव्हा माझ्या पालकांना चित्रपटातील माझ्या भूमिकेबद्दल सांगण्याची वेळ आली तेव्हा मी थोडी घाबरले होते, परंतु त्यांची प्रतिक्रिया खरोखरच वेगळी होती, त्यांनी लगेचच होकार दिला , 'हे फार चांगले आहे.' 'विकी डोनर' हा स्पर्म डोनेशनवर आधारित रोमँटिक कॉमेडी चित्रपट होता. या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर चांगला प्रतिसाद मिळाला. यामी आणि आयुष्मान यांनी नंतर 'आग्रा का डबरा' (२०१६) आणि 'बाला' (२०१९) सारख्या चित्रपटांमध्ये पुन्हा एकत्र काम केले.

# अनुरागने घेतला मुंबई सोडण्याचा निर्णय

चित्रपट दिग्दर्शक अनुराग कश्यपने बॉलीवूडच्या सद्यस्थितीबद्दल निराशा व्यक्त केली आहे. तसेच चांगल्या कलाकृतींच्या निर्मितीसाठी तो मुंबई सोडून दाक्षिणात्य सिनेसृष्टीकडे जाण्याचा विचार करतोय, असा खुलासा त्याने केला. अनुरागने हिंदी चित्रपटसृष्टीतील नफ्याची मानसिकता, रीमेक बनवणं आणि स्टार मेकिंग संस्कृतीवर टीका केली आहे. यामुळे सर्जनशीलता कमी होते आणि कलाकृतींमध्ये नाविन्य नसतं, असं मत अनुरागने मांडलं. अनुराग कश्यप म्हणाला, आता बाहेर जाऊन प्रयोग करणं माझ्यासाठी अवघड आहे; कारण त्यासाठी खूप पैसा लागतो. निर्माते नफा आणि मार्जिनचा विचार करतात. चित्रपटाचं शूटिंग सुरू होण्याआधी, तो कसा विकायचा हे ठरतं. त्यामुळे चित्रपट निर्मितीचा आनंद राहत नाही. म्हणून मला पुढच्या वर्षी मुंबईबाहेर जायचं आहे. मी दक्षिणेत जाणार आहे. मला जिथे काम करावं वाटेल, तिकडे मी जाईन, नाहीतर मी म्हातारा होऊन मरेन. मी या इंडस्ट्रीमुळे खूप निराश झालो आहे आणि वैतागलो आहे. मी या मानसिकतेला वैतागलो आहे. 'मंजुम्मेल बॉईज' सारखे चित्रपट मल्याळम इंडस्ट्रीत बनतात, ते बॉलीवूडमध्ये कधीच बनणार नाही. पण जर एखाद्याने प्रयोग केला आणि तो यशस्वी झाला, तर कदाचित तशा चित्रपटांची निर्मिती होईल. आधीच जे हिट झालंय त्याचेच रिमेक बनवायचे अशी मानसिकता आहे. ते काहीही नवीन करण्याचा प्रयत्न करणार नाहीत, असं अनुराग म्हणाला. अनुराग कश्यपने टॅलेंट एजन्सींवरही टीका केली. नवीन प्रतिभा शोधण्यापेक्षा नफ्याला प्राधान्य दिलं जातं, असं मत त्याने मांडलं. एजन्सी असंच करते. ते फक्त तुमच्याकडून पैसे कमवतात. ते नवीन लोकांचे करिअर तयार करण्यासाठी गुंतवणूक करत नाहीत. त्यांना नवीन कलाकारांना इंडस्ट्रीत पुढे जाऊ द्यायचं नाही. ते त्यांना अभिनयाच्या कार्यशाळेत पाठवण्याऐवजी जिममध्ये पाठवतात, असं अनुराग कश्यप म्हणाला. अनुरागने अशा कलाकारांबद्दल निराशा व्यक्त केली, ज्यांना तो एकेकाळी मित्र मानायचा. एका अभिनेत्याने, ज्याला मी मित्र मानत होतो, तो आता मला टाळतो, कारण त्याला एका विशिष्ट पद्धतीने पुढे जायचं आहे. अशा गोष्टी इथेच घडतात, मल्याळम इंडस्ट्रीत असं घडत नाही, असं अनुरागने नमूद केलं. अनुराग नुकताच १९ डिसेंबर २०२४ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झालेल्या मल्याळम ॲक्शन थ्रिलर 'रायफल क्लब'मध्ये झळकला होता.

